'विकसित भारत'साठी कौशल्य विकास आणि उद्योजकता काळाची गरज; नाइट कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्समध्ये राष्ट्रीय चर्चासत्र संपन्न




कोल्हापूर :

येथील कौन्सिल ऑफ एज्युकेशन संचलित, नाइट कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स, कोल्हापूर तर्फे 'कौशल्य विकास आणि उद्योजकता: विकसित भारतामधील युवा सक्षमीकरणाचा मार्ग' (Skill Development and Entrepreneurship: A Roadmap to Youth Empowerment in Viksit Bharat) या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र उत्साहात संपन्न झाले.

कार्यक्रमाचे उद्घाटन मयुरा स्टील्स प्रायव्हेट लिमिटेडचे अध्यक्ष मा. श्री. चंद्रशेखर डोली यांच्या हस्ते झाले. यावेळी बोलताना ते म्हणाले की, "आजच्या स्पर्धात्मक युगात केवळ पदवी पुरेशी नाही, तर उद्योजक बनण्यासाठी लागणारी जोखीम घेण्याची वृत्ती तरुणांनी जोपासली पाहिजे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी स्थानिक संसाधनांचा वापर करून नवनवीन स्टार्टअप्स सुरू करण्यावर भर द्यावा".

आर्म मशीन टूल कंपनीचे मा. श्री. आर. आर. मुसानी यांनी बीजभाषण (Keynote Address) करताना तांत्रिक कौशल्यांचे महत्त्व सांगितले. त्यांनी नमूद केले की, "जागतिक बाजारपेठेत भारताचे स्थान मजबूत करण्यासाठी कुशल मनुष्यबळाची गरज आहे. तंत्रज्ञानातील बदलांशी जुळवून घेणारे शिक्षणच युवकांना खऱ्या अर्थाने स्वावलंबी बनवू शकते".

प्रथम सत्रात श्री. अनिल नागराळे (CEO, कोल्हापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशन) यांनी बँकिंग क्षेत्रातील बदलांवर प्रकाश टाकला. ते म्हणाले की, "बँकिंग क्षेत्राचे वेगाने डिजिटलायझेशन होत असून, विद्यार्थ्यांना तांत्रिक साक्षरतेसोबतच 'सॉफ्ट स्किल्स' आत्मसात करणे अनिवार्य आहे. केवळ पुस्तकी ज्ञान न ठेवता आर्थिक व्यवहार आणि बँकिंग कार्यप्रणालीचे प्रत्यक्ष ज्ञान मिळवणे ही काळाची गरज आहे". या सत्राचे अध्यक्ष प्रा. डॉ. एस. एस. महाजन यांनी शैक्षणिक अभ्यासक्रम आणि उद्योगांची गरज यामध्ये सांगड घालण्याचे आवाहन केले.

द्वितीय सत्रात शिवाजी विद्यापीठाचे माजी बँक ऑफ इंडिया चेअर प्रोफेसर डॉ राजन पडवळ यांनी मार्गदर्शन केले. ते म्हणाले की, "नोकरीच्या शोधात राहण्यापेक्षा स्वतःचा उद्योग उभा करणे हा देशाच्या विकासासाठी सर्वात मोठा हातभार ठरेल. विद्यार्थ्यांनी आपल्यामधील उपजत कलागुणांना ओळखून योग्य त्या प्रशिक्षणाद्वारे त्याचे व्यवसायात रूपांतर करावे". सत्राचे अध्यक्ष डॉ. के. व्ही. मारुलकर यांनी उद्योजकीय मानसिकता कशी विकसित करावी, यावर मार्गदर्शन केले. तिसऱ्या सत्रात प्राध्यापकांनी आपल्या संशोधन पेपर चे वाचन केले. या सेमिनार साठी देशभरातून ५८ संशोधन निबंध आले होतें. या सत्राचे अध्यक्ष म्हणून प्रा अभिजीत मिसाळ यांनी काम बघितले. समारोप प्रसंगी डी. आर. के. कॉलेजच्या प्राचार्या डॉ. वर्षा मैंदर्गी यांनी विद्यार्थ्यांना कॉमर्स क्षेत्रातील विविध स्किल कोणते आहेत याची माहिती दिली.त्यांनी सांगितले की, "अशा चर्चासत्रांमुळे विद्यार्थ्यांच्या विचारांना चालना मिळते आणि त्यांना विविध स्किल ची सखोल माहिती मिळते. " कौन्सिल ऑफ एज्युकेशनचे सचिव मा. डॉ. विश्वनाथ मगदूम यांनी अध्यक्षीय भाषणात संस्थेच्या वतीने अशा उपक्रमांना नेहमीच सहकार्य राहील, अशी ग्वाही दिली

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. उत्तम पाटील यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी या सेमिनार चे समन्वयक प्रा. अभिजित कांबळे आणि प्रा डी एस जाधव यांनी प्रयत्न केले. सेमिनार चे सूत्रसंचालन प्रा डॉ अक्षता गावडे यांनी केले. महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी या सेमिनारसाठी परिश्रम घेतले.